

बेडूक आणि जगाची सफर

मैक्स वी.


मराठी : अश्विनी बर्वे

बेडूक आणि जगाची सफर




मैक्स वी.

मराठी : अश्विनी बर्वे



उंदीर एका डोंगराच्या कड्यावर उभा राहून क्षितिजाकडे बघू लागला.

“जग खूप सुंदर आहे,” त्याने खोल श्वास घेतला आणि लगेचच आपल्या आत एक अस्वस्थता त्याला जाणवली. “आता एक प्रवासाला जाण्याची माझी वेळ आली आहे.”





दुसऱ्या दिवशी सकाळी-सकाळी त्याने आपल्या बॅगेत त्या जरुरी गोष्टी भरल्या, ज्यांची त्याला प्रवासात गरज भासू शकली असती. त्याने प्रवासात लागणाऱ्या खाण्याच्या गोष्टी सुद्धा बरोबर घेतल्या.

मग तो आपल्या प्रवासासाठी निघाला. त्याच्या हृदयात रोमांच आणि उत्सुकता होती.

तो अजूनही खूप दूर गेला नव्हता तेवढ्यात त्याला ओरडण्याचा आवाज ऐकू आला. “माझ्यासाठी थांब!”

त्याने बघितले बेडूक त्याच्याकडे पळत येत होते.

“उंदरा!“ बेडूक म्हणाले. “तू कुठे जात आहे?”

“मी सगळं जग फिरायला जात आहे,” उंदीर म्हणाला. “मला असे साहस करतांना खूप मजा येते.”



“मी तुझ्याबरोबर येवू शकतो का?” बेडकाने उत्साहाने विचारलं.

“अजिबात नाही!“ उंदीर ओरडला. “एवढ्या लांबच्या प्रवासासाठी तू खूप छोटा आहेस.”

“बघ उंदरा, मी जरी छोटा दिसत असलो तरी मी ताकदवान आहे. मी माझ्या वस्तू स्वतः उचलू शकतो. आणि जर प्रवासात दोन लोक असतील तर तुलाही अधिक मजा येईल.”



"ठीक आहे, मग चल," उंदीर म्हणाला. “पण रस्त्यात मध्येच मागं फिरायचं नाही.”

मग दोघा दोस्तांनी मिळून जगाचा प्रवास सुरु केला.

बेडकाने सामानाची पिशवी उचलली आणि उंदराने रस्ता दाखवला.

“प्रवास किती सुंदर आहे,” थोड्यावेळाने बेडूक म्हणाले. “या भागातली घरं खूप वेगळी आहेत.” बेडूक आधी कधी एवढ्या दूर गेला नव्हता.





एक मैल पुढे गेल्यानंतर बेडकाने बसून घेतलं. “मला भूक लागली आहे,” ते म्हणालं. “आपण दुपारचं जेवण कधी करू शकतो?”

“काय?" उंदीर ओरडला. “आपण आत्ताच तर प्रवासाला सुरुवात केली आहे.”

तरीपण बेडकाने आपल्या सॅक मधून दोन बटर लावलेले सॅन्डविच काढले. तो ते स्वतः खाण्यासाठी तयार होता. “हा केवळ नाष्टा आहे,” उंदराने कडक आवाजात म्हटले, “आपल्याला अजून एक लांबवरचा रस्ता पार करायचा आहे.”

सैंडविच खाल्ल्यावर ते परत चालू लागले.

“आपण आपल्या ठिकाणच्या जवळ आहोत का?” बेडकाने विचारलं.

“काय?” उंदीराणे विचारलं.

“आपण मोठ्या जगाच्या आसपास आहोत का?” बेडकानं म्हटलं.

“आपण तिथं कसं असू शकतो?” उंदराने घाईने विचारलं. “आपण आत्ता आत्ता तर घर सोडलं आहे.”



जेव्हा त्यांनी चालणं बंद केलं तेव्हा जवळजवळ सूर्यास्त झाला होता.

बेडकानं जमिनीवर पडून घेतलं. “मी आता थकलो आहे.मी अजून पुढे चालू शकत नाही,” तो रडू लागला. “आपण घरी कधी जायचं?”

"घर?" उंदीर चकित झाला. “घर इथून खूप दूर आहे! ही ती जागा आहे जिथं आपण रात्र काढणार आहोत.”



उंदराने आरामदायी जागा निवडली आणि मग ते दोघं तिथं आराम करण्यासाठी पडले.

“उंदरा,“ बेडकानं थोड्यावेळानं म्हटलं, “मला झोप येत नाही.”

“आपले डोळे बंद कर आणि तुझ्या आवडीच्या गोष्टींबद्दल विचार कर,” उंदीर म्हणाला.

बेडकानं खूप प्रयत्न केला पण त्या युक्तीचा काही उपयोग झाला नाही. त्याला विचित्र असे आवाज येत होते.

तो कदाचित सिंह असेल....नाहीतर वाघ असेल.





जेव्हा सकाळ झाली तेव्हा बेडकाला उठायची इच्छा नव्हती. पण उंदराचे पुढे प्रवास करण्याचे नक्की होते. आणि मग दोघांनी डोंगर चढत आणि दऱ्या ओलांडत जगाचा प्रवास चालू ठेवला.

“आपण आपल्या ठिकाणाच्या जवळ आहोत का?” बेडकानं धापा टाकत विचारलं.

“अजिबात नाही,” उंदीर म्हणाला. “जर तुला हे मोठं जग बघायचं असेल तर तुला निश्चयी व्हावं लागेल.”


अचानक आकाशात अंधार पसरला. सूर्य ढगाच्या आड लपला आणि पाऊस सुरु झाला. आधी हळूहळू नंतर खूप जोरात. दोन्ही मित्र पाऊसा पासून वाचण्यासाठी धावले.



ते कोरडे राहिले पण बेडकाला थंडी वाजू लागली.

"मी विचार करतो आहे की घरी सगळ्या वस्तू कशा असतील," तो हळू आवाजात म्हणाला. "मला विचार करतोय की डुक्कर कसं असेल? आणि बदक आणि ससा?"


"पाऊस थांबला आहे," उंदीर म्हणाला. "आता निघू या."



ते चालत राहिले आणि चालत राहिले, शेवटी ते एका जंगलातल्या निर्जन पहाडावर पोहचले. ते दगड आणि खडकांवर चढले.

"ज़रा तिकडे बघ! किती सुंदर नजारा आहे?" उंदीर म्हणाला.

पण बेडूक तिथं घसरून पडलं आणि ते काहीच बघू शकलं नाही.





“मला वाटतं की माझा पाय तुटला आहे,”बेडूक रडत म्हणालं.

“त्यात खूप वेदना होत आहे, म्हणून मला चालणं खूप मुश्किल होईल.”

“अशा पद्धतीने आपण कुठेच पोहचणार नाही, ”उंदीर बडबडला. “आतापासून मी तुला उचलून घेवून चालेन.”

मग उंदराने बेडकाला आपल्या पाठीवर घेतलं आणि पुढे निघाला.

“कदाचित डुक्कर केक बनवत असेल,” बेडूक म्हणालं. “आश्चर्य वाटत आहे की बदक आणि ससा काय करत असतील? आपल्याला एकमेकांना भेटून नेहमी घरात मजा करत असू.”





"तू तुझं बाकी आयुष्य घरात बसून काढू शकतो," उंदीर म्हणाला.

"आता आपण परदेशी भूमीवर आहोत. जरा आपल्या चारी बाजूला बघ! बघ इथं किती सुंदर दृश्य आहे? आणि इथली प्रत्येक जागा एकदम नवी आहे."

शेवटी ते एका गवताच्या मैदानावर पोहचले. उंदराने बेडकाला जमिनीवर ठेवले.

"मी थकलो आहे," उंदीर म्हणाला. "आपण इथंच झोपू."

"इथं?" बेडूकाने निराश होत विचारलं, "घरी माझ्याकडे सगळ्यात चांगलं, आरामदायी अंथरूण आहे. पण बेडूक सुद्धा थकलं होतं, आणि लवकरच ते झोपलं.



पण जेव्हा ते दुसऱ्या दिवशी सकाळी उठलं तेव्हा बेडकाची हालत फार खराब होती.

“उंदरा, माझी तब्येत ठीक नाही. मला खूप आजाऱ्यासारखं वाटत आहे. आता मला सगळं जग बघण्याची इच्छा नाही. मला घराची आठवण येत आहे.”

“तू जगभरच्या प्रवासासाठी खूप छोटा आहे,” उंदीर म्हणाला. “तू आजारी नाहीस. पण तुला घराची आठवण सतावते आहे.”



"घराची आठवण?” हे शब्द ऐकून बेडकाने उसळून विचारलं, “मग ती वाईट गोष्ट आहे का?”

“खूप नाही,” उंदीर म्हणाला. “हो, घरी पोहचल्यावर तुला एकदम छान वाटेल.” "घर ......" बेडूक बडबडला.

“आता आपला प्रवास संपला,” उंदीर म्हणाला, आता आपण घरी परत जात आहोत.”



उंदराला आता बेडकाला धक्के देण्याची आवश्यकता राहिली नाही. तो वेगाने डुक्कर, बदक आणि सश्याकडे पळत गेला. त्याला बघून उंदीर हसू लागला.

"तुला घरी परत जायला चांगलं वाटत नाही का?" बेडकानं विचारलं.

"नाही, नाही," उंदीर म्हणाला. "मला पण घराची थोडीथोडी आठवण सतावत होती. मलाही घरी जावून चांगलं वाटेल."



शेवटी तासंतास चालल्यावर बेडूक जोरानं ओरडलं.

"बघ! आपण जवळजवळ घरी पोहचलोच."

आणि मग काही अंतरावर त्यांनी डुक्कर, बदक आणि ससा त्यांची वाट बघतांना पाहिले. बेडूक आपल्या मित्रांकडे एवढ्या जोरात धावला की जसे त्याला पंख लावले आहेत.



"स्वागत आहे !" ससा म्हणाला. "तुमचा प्रवास कसा झाला?"

"खूप छान!" बेडूक म्हणालं. "बाहेरचे जग खूप सुंदर आहे.

आणि आम्हांला खूप रोमांचक अनुभवही आले. तिथं सिंह आणि वाघ सुद्धा होते आणि."

"तू लगेच आत ये,"डुक्कर म्हणाले, "आणि आम्हांला तुझे अनुभव सगळे सांग."

"मी नुकताच एक केक बनवला आहे आणि तुला भूक लागली असेल." बेडकाला तेच ऐकायचं होतं.



मग सगळे लोक डुक्कराने केलेला केक खाण्यासाठी टेबलाच्या चारी बाजूला बसले.मग बेडकाने भयानक वादळाचे आपल्या शौर्याचे वर्णन केले. ते किती उंच डोंगरावर चढले आणि त्यांनी तिथं काय काय पाहिलं.

"पण तरीही घरासारखी कोणती जागा नाही,"बेडूक म्हणालं. आणि त्याने आपल्या चांगल्या, गरम,छोट्या अंथरुणाच्या बाबत आनंदाने विचार केला..

समाप्त